दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १४१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.०२ जानेवारी २०२५





## मनोज जरांगेंचा मुख्यमंत्र्यांना इशारा !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, बीड :** बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली. या घटनेचे तीव्र पडसाद राज्यात उमटले. तसंच हिवाळी अधिवेशनाच्या दरम्यानही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत स्पष्टीकरण द्यावं लागलं. या हत्या प्रकरणातील मुख्य संशयित वाल्मिक कराड मंगळवारी पोलिसांना शरण आला आहे. दरम्यान या प्रकरणातले काही आरोपी फरार आहेत. यावरुन मनोज जरांगेंनी देवेंद्र फडणवीस यांना रस्त्यावर उतरण्याचा इशारा दिला आहे.

**काय म्हणाले मनोज जरांगे?**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली. त्यांच्या कुटुंबीयांना मी भेटलो.या प्रकरणातील आरोपीला अजून अटक झालेली नाही याबाबत त्यांनी चर्चा केली. आमच्या सर्वांची इच्छा आहे, सर्व आरोपींना अटक झाली पाहिजे. त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. त्यासाठी आता राज्यभर मोर्चे सुरु झाले आहेत, असं जरांगे म्हणाले.

**आत्ताच हे सगळं गृहमंत्र्यांचं अपयश आहे असं म्हणता येणार नाही-जरांगे**

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना अटक न होणे हे गृहमंत्र्यांचे अपयश आहे की नाही हे याबाबत आताच काही सांगता येणार नाही, राजकरणात, समाजकारणात काम करताना कोणी कोणाचे लाडकं नसतं, शत्रू नसतो, विरोधक नसतो. ज्या ज्या वेळेस चुका होतील त्या त्या वेळेस बोलावे लागेल. मुख्यमंत्री दिलेला शब्द पाळत असतील तर आम्ही अपेक्षा ठेवून आहोत. शब्द नाही पाळला तर आम्ही रस्त्यावर उतरणार असा इशारा मनोज जरांगेंनी दिला.

**धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याच्या मागणीबाबत काय म्हणाले जरांगे?**

मनोज जरांगे या प्रकरणातील संशयित वाल्मिक कराड हा मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळचा आहे. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी होते आहे. याबाबत विचारलं असता जरांगे म्हणाले, धनंजय मुंडे यांचा या हत्या प्रकरणात सहभाग आहे की नाही हे लवकरच सिद्ध होईल. आता चौकशी सुरु झाली आहे. काही आरोपी फरार आहेत.





त्यांचे सीडीआर घेतले जातील. कॉल डिटेल्सवरुन सगळे समोर येईल. कोणी खंडणी मागितली, कोणी मागायला लावली, कोणी फोन करायला लावले, आरोपी कोणी फरार केले, आरोपींना सांभाळतं आहे? हे सगळं चौकशीतून सम ोर येईल. या प्रकरणातील आरोपींना मोक्का लागणार आहे. ३०२ चा गुन्हा लावला जाऊ शकतो. सरकारने हे केले नाही तर मराठे पुन्हा रस्त्यावर येतील, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला. आता या प्रकरणात आणखी काय काय होणार? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

## पनवेल मनपा शिक्षण विभागातील शिक्षकांच्या ड्रेस कोडचे अनावरण




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०१, पनवेल :** महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या संकल्पनेतून व अतिरिक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त प्रसेनजीत कारलेकर यांच्या म ार्गदर्शनाखाली पनवेल मनपा शिक्षण विभागातील शिक्षकांसाठी ड्रेस कोड ब्लेझर व ट्रॅक सुट तयार करण्यात आला आहे. आज दिनांक १ जानेवारी रोजी या ड्रेस कोडचे अनावरण शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिक्षक संघटनेच्या राज्य उपाध्यक्षा ज्योत्स्ना भरडा, राज्य सल्लागार प्रमोदजी लांगी, कोकण विभागिय अध्यक्ष वैभव पाटील, केंद्र समन्वयक अशफाक काझी व सर्व मुख्याध्यापक वर्ग उपस्थित होता. बदल ही काळाची गरज आहे' ही उक्ती प्रत्यक्षात उतरण्यासाठी पनवेल महानगरपालिका शिक्षण विभागातील शिक्षक नविन वर्षात सज्ज झाले आहेत. गुणवत्तापूर्ण उपक्रम राबवून पालिकेतील विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे काम सर्व शिक्षक वृंदाकडून होवो, अशा शुभेच्छा पनवेल महानगर पालिका शिक्षणाधिकारी यांनी यावेळी दिल्या.

हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षिका ज्योत्स्ना भरडा यांनी पुढाकार घेऊन महत्वपूर्ण भूमिका बजावली.

## श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीस एका वर्षात ५३ कोटी १७ लाखाचे मिळाले दान

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०१, पंढरपूर :** अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या पंढरीच्या श्री विठ्ठल रुक्मिणी मातेला महाराष्ट्रासह इतर राज्यातून येणाऱ्या वारकरी भाविक भक्तांनी एका वर्षामध्ये समितीच्या विविध माध्यमातून सुमारे ५४ कोटी रुपयांचे दान केले आहे.

याबाबत मंदिर समितीकडून मिळालेली अधिक माहिती अशी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस दिनांक १ जानेवारी ते २७ डिसेंबर २०२४ या कालावधीत ५३ कोटी ९७ लाखाचे दान प्राप्त झाल्याची माहिती व्यवस्थापक मनोज शोत्री यांनी दिली.

मंदिर समिती मार्फत भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. त्यामध्ये प्रामुख्याने दर्शनरांग व्यवस्थापन, अन्नछत्र, लाडूप्रसाद, निवास इत्यादीचा समावेश आहे. याशिवाय, भाविकांना श्रींच्या नित्यपुजा, पाद्यपुजा व तुळशीपूजा देखील उपलब्ध करून देण्यात येत आहे. यात्रा कालावधीत भाविकांच्या पायांना खडे टोचू नये म्हणून दर्शनरांगेत मॅटींग, विश्रांती कक्ष, आपत्कालिन दरवाजे, हिरकणी कक्ष, मोफत अन्नछत्र, एकादशीला शाबुदाणा खिचडी वाटप, द्वादशीला तांदळाची खिचडी, मिनरल वॉटर, चहा, आरोग्य व्यवस्थेचे स्टॉल इ. उपक्रम मंदिर समितीने सुरू केले आहेत. श्री विठ्ठल रुक्मिणीच्या पुजेसाठी वाढती मागणी विचारात घेऊन, नित्यपुजेत २ भाविक कुटुंबियांना संधी, अन्नछत्र सहभाग योजना, महानैवेद्य सहभाग योजना, तुळशी अर्चन पुजा सुरू केल्या असून, त्याची नोंदणी देखील ऑनलाईन करण्यात आली आहे, या नोंदनीस भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.मंदिर समितीस वारकरी भाविकांकडून चांगले दान मिळत असून, मिळालेल्या दानातून श्रींच्या दर्शनासाठी येणा-या वारकरी भाविकांना चांगल्या व अत्याधुनिक सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचा प्रयत्न राहील असे यावेळी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

वारकरी भाविकभक्तांची पंढरीच्या श्री विठ्ठल रुक्मिणी वर अनन्य साधारण श्रद्धा असल्याने आषाढी मध्ये वारकरी, भावीक आळंदी ते पंढरपूर दिंडी मधून पायी चालत येतात. विठ्ठलाचे भक्त हे सर्वसामान्य मध्यम वर्गातील व गोरगरीब वर्गातील असल्याने विठ्ठलाकडे केलेली मागणी पूर्ण होते ही आस घेऊन ऊन, वारा, पावसाची तमा न बाळगता मजल दरमजल करत पायी चालत विठ्ठल भेटीसाठी पंढरीत येत असतात. यामध्ये कष्टकरी कामगार वर्ग मोठ्या प्रमाणे असल्याने एक वेळ पोटाला न खाता हे वारकरी भक्त विठ्ठलासाठी दान करत असल्याने सन २०२४ मध्ये विठ्ठलाच्या चरणी विविध माध्यमातून याच भक्तांनी सुमारे ५४ कोटीचे दान दिले आहे.

## माजी आ.प्रदीप नाईक यांना उपमुख्यमंत्री पवार यांची श्रद्धांजली



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, मुंबई :** किनवटचे माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या निधनाने धडाडीचा लोकप्रतिनिधी, कर्तव्यनिष्ठ लोकसेवक हरपला आहे. त्यांच्या निधनाने किनवटच्या सामाजिक जीवनाशी घट्ट नाळ जुळलेले व्यक्तिम त्त्व हरपले आहे. किनवट विधानसभा मतदारसंघाच्या विकासात त्यांनी दिलेले योगदान कायम स्मरणात राहील.

दिवंगत प्रदीप नाईक यांच्या कुटुंबियांच्या, सहकाऱ्यांच्या, कार्यकर्त्यांच्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी असून मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो. अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करुन श्रद्धांजली वाहिली.

## नववर्ष स्वागत कार्यक्रमात समाजसेवेचा संदेश : गोस्वामी समाजाने दाखवली एकजूट

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०१, डोंबिवली (ठाणे) :** नववर्षाच्या स्वागतासाठी आयोजित विशेष कार्यक्रमात गोस्वामी समाज अध्यक्ष श्री प्रदीप गोस्वामी यांच्या नेतृत्वाखाली एकतेचा सुंदर आदर्श पाहायला मिळाला. कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सहभाग घेतला आणि गरजूंना मदतीचा हात पुढे करून एक समाजहिताचा संदेश दिला.

कार्यक्रमाला गोस्वामी समाजातील मोहन गोस्वामी (तिवारी), अखिलेश सिंह भुआल, सुरेंद्र उपाध्याय (हेरिटेज



मोटर्स), मगनलाल ठक्कर (थानावाला), मनीष पांडे, आणि विनय सिंह (संस्कार क्लासेस) यांसारखे मान्यवर उपस्थित होते. गोस्वामी सेवा संघाने शहरातील विविध संस्थांची एकत्रित बैठक आयोजित केली होती, ज्यामध्ये समाजाच्या प्रगतीसाठी एकजूट दाखवण्याचा विशेष संदेश देण्यात आला. या कार्यक्रमादरम्यान ठाणेतील किल्ला ध्वजाला मान्यता देण्यात आली आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी कार्यक्रम ाची शोभा वाढवली.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण गरजूंना कंबळांचे वाटप करणे होते. थंडीत कडाक्याची झळ सहन करणाऱ्या लोकांना या उपक्रमामुळे उब मिळाली. यासाठी कार्यक्रमातील सर्व उपस्थितांचे विशेष योगदान लाभले.

या उपक्रमाने नववर्षाची सुरुवात समाजहिताच्या उद्देशाने झाली असून, गोस्वामी समाजाचा हा उपक्रम अनेकांसाठी प्रेरणादायक ठरला.

## महराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने स्मरणपत्र देताच ग्रामपंचायतींना तातडीच्या सुचना

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०१, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुका हा क्रांतिकारक सेनापती बापटांचा,जेष्ठ समाजसेवक आण्णासाहेब हजारे यांचा तालुका असुन याच तालुक्यातून राज्याला दिशादर्शक मोठी राज्यव्यापी चळवळ उभी झाली असुन महारष्ट्रात शिव पानंद शेतरस्त्यांच्या प्रश्नावर राज्यात मोठे काम उभे झाले आहे. राज्यातील अनेक तालुक्यांसह, जिल्ह्यांमध्ये मोठमोठी यशस्वी आंदोलने होत असताना गावोगावचे शेतकरी आंदोलनात सक्रीय होत असून गावागावातील अनेक शेतरस्ते चळवळीच्या माध्यमातून खुले होताना दिसत आहेत या ऐतिहासिक चळवळीला छत्रपती संभाजीनगर हायकोर्टाच्या निकालाने बळकटी दिली असून अर्ज केल्यानंतर तहसिलदारांनी ६० दिवसांत शेतरस्ता खुला करून हद्द निश्चित करून देण्याचे आदेश दिले असून अनेक वर्षांचा प्रशासकीय न्यायालयीन संघर्ष यामाध्यमातून सुटणार आहे.

दि.३१ डिसेंबर रोजी महाराष्ट्र राज्य शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांच्या नेतृत्वात पारनेर शासकीय विश्रामगृहावर पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली त्यानंतर चळवळीच्या माध्यमातुन पारनेरचे गटविकास अधिकारी दयानंद पवार यांना शासन निर्णयाच्या अंमलबजावणीचे स्मरणपत्र देताच बीडीओंनी पारनेर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींना २६ जानेवारी पर्यंत ग्राम शेतरस्ते खुले करण्यासाठी ग्रामस्तरीय समिती गठीत करून समितीचा अहवाल सादर करण्याचा तातडीचा आदेश काढत शेतकऱ्यांसाठी ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल पारनेर तालुक्यातील सर्व शेतकरी वर्गातुन त्यांचे कौतुक केले जात आहे. यावेळी पारनेर तालुका शिव पानंद शेतरस्ता चळवळीचे सचिन शेळके, भाऊसाहेब वाळुंज, दसरत वाळुंज, संजय साबळे, बबन गुंड, हनुमंत शेटे, सुभाष शेळके, बाबाजी घोगरे, बापूसाहेब जंगले, पंढरीनाथ काळखे, स्वप्निल गट, लक्ष्मण वाढवणे, रघुनाथ वाढवणे, मयूर वाढवणे, किसन जंजाड, अविनाश वाढवणे, मारुती वाळुंज, बाबा पठाण आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**अशी असेल ग्रामस्तरीय समिती !**

सरपंच अध्यक्ष, मंडळ अधिकारी महसूल, तंटामुक्ती समिती अध्यक्ष, चेअरमन विकास सेवा सोसायटी, प्रगतशील शेतकरी, एक महिला ग्राम पंचायत सदस्य, कृषी सहाय्यक, बीट जमादार, पोलीस पाटील, तलाठी आदी सदस्य राहतील.

महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने राज्यभर पिढ्यानपिढ्या शेतकऱ्यांचा चाललेला संघर्ष संपवण्यासाठी ब्रिटीशकालीन शिव पानंद शेतरस्त्यांच्या प्रश्नावर जनजागृती अभियान,जन आंदोलन,न्यायालयीन लढ्याच्या माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधत राज्यात सुरू झालेल्या चळवळीला मोठे यश प्राप्त होत असून तालुका,जिल्हा प्रशासनाकडून या आंदोलनाची दखल घेण्यात येत आहे तरी राज्यातील ज्या ग्रामपंचायती गावातील सर्व शिवपानंद शेतरस्ते खुले करतील अशा ग्राम पंचायतींचा महाराष्ट्र शिव पानंद शेतरस्ता चळवळ विशेष पुरस्कार देत सन्मान करेल

**– शरद पवळे, दादासाहेब जंगले पाटील(महा.रा. शिव पानंद शेतरस्ता चळवळ)**

## नववर्षाच्या पहिल्याच दिवशी नक्षलवादी चळवळीला मोठा हादरा !

**दि.०१, गडचिरोली :** नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी नक्षलवादी चळवळीला मोठा हादरा बसला. मागील ३८ वर्षापासून नक्षल चळवळीत सक्रिय असलेली जहाल नक्षलवादी, दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीची सदस्य आणि नक्षल्यांच्या केंद्रीय समि तीचा सदस्य भूपती याची पत्नी विमला सिडाम उर्फ तारक्का हिच्यासह ११ नक्षलवाद्यांनी बुधवारी गडचिरोली पोलीस मुख्यालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले.

त्यात १ डीकेएसझेडसीएम, ३ डीव्हीसीएम, २ एसीएम व ४ दलम सदस्यांचा समावेश आहे. या सर्वांवर एकूण ८६ लाख ५ हजार रुपयांचे बक्षीस होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आत्मसमर्पण करणाऱ्या नक्षल्यांना संविधानाची प्रत देऊन त्यांचा सत्कार केला. दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीची सदस्य तारक्का ही मागील ३८ वर्षापासून नक्षल चळवळीत होती. नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य भूपती याची ती पत्नी आहे. तिच्यावर २५ लाख रुपयांचे बक्षीस होते. विमला चंद्रा सिडाम उर्फ तारक्का उर्फ वत्सला उर्फ तारा डीकेएसझेडसीएम, सुरेश उईके उर्फ चैतू उर्फ बोटी, डीव्हीसीम कुतुल एरिया कमिटी व त्याची पत्नी कल्पना गणपती तोर्रेम उर्फ भारती उर्फ मदनी (डीव्हीसीएम), अर्जुन तानू हिचामी उर्फ सागर उर्फ सुरेश डीव्हीसीएम राही दलम व त्याची पत्नी सम्भ पांडू मट्टामी उर्फ बंडी (एसीएम डी. के. झोन डॉक्टर टीम), वनिता सुकलू धुर्वे उर्फ सुशीला (एसीएम भामरागड दलम), निशा बोडका हेडो उर्फ शांती उपकमांडर पेरमिली दलम, श्रुती उलगे हेडो उर्फ मन्ना, सदस्य कंपनी क्रमांक १०, शशिकला पतीराम धुर्वे पश्चिम सबझोनल प्रेस टीम सदस्य, सोनी सुक्कू मट्टामी राही दलम सदस्य, आकाश सोमा पुंगाटी उर्फ वत्ते सदस्य प्लाटून नंबर ३२ यांचा आत्मसमर्पण करणाऱ्यांमध्ये समावेश आहे.

# संपादकीय



## बाल विवाह समस्येचे उच्चाटन व्हावे

बाल विवाहावर कायदेशीर बंदी असतानाही आज बाल विवाह कमी होताना दिसत नाही. दररोजच्या वर्तमानपत्रात बाल विवाह झाल्याची एखादी तरी बातमी असतेच. महाराष्ट्रा सारख्या पुरोगामी आणि प्रगत राज्यातही बाल विवाहाचे प्रमाण लाक्षणिक आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याला हे भूषणावह नाही. लॉक डाऊनमध्ये तर बालविवाहाचे प्रमाण खूप वाढले होते आता सर्व सुरळीत सुरू झाल्यानंतर तरी बाल विवाहाचे प्रमाण कमी होईल असे वाटले होते मात्र अजूनही राज्यात बाल विवाह होत आहेत. अर्थात इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्रातील बाल विवाहाचे प्रमाण कमी आहे ही समाधानाची बाब असली तरी बाल विवाह पूर्णतः रोखण्यात महाराष्ट्र अपयशी ठरला आहे हे मान्यच करावे लागेल. मागील वर्षी द लांसेट ग्लोब हेल्थ या शोध पत्रिकेत एक अहवाल प्रकाशित झाला. या अहवालात आपल्या देशातील बाल विवाहाचा सद्य स्थितीवर बोट ठेवण्यात आले आहे. या अहवालानुसार देशातील काही राज्ये तसेच केंद्र शासित प्रदेशांमध्ये २०१६ ते २०२१ या कालावधीत बाल विवाहाची कुप्रथा सामान्य बनली असल्याचा दावा केला आहे. बाल विवाहामुळे देशाच्या प्रगतीला खीळ बसल्याचेही या अहवालात म्हंटले आहे याचाच अर्थ देशात आजही बालविवाह होत आहेत. राज्यातही होत आहेत. राज्याच्या विविध विभागातून मिळालेल्या माहितीनुसार राज्यातील १६ आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये मागील चार वर्षामध्ये अल्पवयीन मातांची संख्या १२, २५३ इतकी आढळून आली आहे. या आदिवासी जिल्ह्यांत १८ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या गर्भवती मातांची संख्या देखील लाक्षणिक आहे. बाल विवाहाची प्रथा काही आदिवासी जमातींमध्ये पिढ्यानपिढ्या सुरू आहे. हा परंपरेचा भाग असला तरी पुणे मुंबई सारख्या शहरात आणि राज्याच्या ग्रामीण भागातही बाल विवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे हे कोणालाही नाकारता येणार नाही. आपल्या देशात मुला मुलींच्या लग्नाचे वय कायद्याने ठरवून दिले आहे. मुलांचे लग्नाचे वय २१ तर मुलींच्या लग्नाचे वय १८ असावे असे कायदा सांगतो त्यापेक्षा कमी वयात विवाह झाला तर तो बाल विवाह समजला जातो. २००६ साली केंद्र सरकारने बाल विवाह प्रतिबंधक कायदा नव्याने मंजूर केला. मात्र सरकारने मंजूर केलेल्या कायद्यानुसार बाल विवाहास कठोर शिक्षेची तरतूद आहे. मात्र या कायद्याची योग्य अंमलबजावणी होत नसल्याने या कायद्याचा धाक राहिला नाही. बाल विवाह झालेल्या मुला मुलीला लहानपणीच संसाराचा गाढा हाकलावा लागतो त्यामुळे त्यांचे बालपण हिरावले जाते. शिक्षण अर्धवट राहते. बाल विवाह झालेल्या मुलींना अल्पवयातच मातृत्व प्राप्त होते. त्यामुळे जन्माला येणारे बाळ देखील सशक्त नसते. बाल वयातच आई झालेल्या मुलीला देखील आरोग्याच्या समस्या निर्माण होतात त्यामुळे कुपोषणासह अनेक रोगांना त्यांना सामोरे जावे लागते. आज आपला देश सर्वच क्षेत्रात प्रगती करीत आहे. इंटरनेट, मोबाईल, आधुनिक तंत्रज्ञान यामुळे आपण जगासोबत स्पर्धा करीत आहोत. अगदी चंद्रावर देखील आपण स्वारी केली आहे. जगातील प्रगत देशात आपली गणना होऊ लागली आहे. आधुनिक शिक्षण घेऊन आपण काळासोबत पुढे जात असताना खेड्यापाड्यातील मुली बाल विवाहाला बळी पडत आहेत. ही विसंगती बदलायला हवी. त्यासाठी बाल विवाह समस्येचे मुळापासून उच्चाटन व्हायला हवे. बाल विवाह या सामाजिक समस्येचे उच्चाटन करायचे असेल तर सर्वानाच जागृत करणे गरजेच आहे. भारतात बाल विवाहाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन, प्रशासन, सामाजिक संस्था, व समाजाने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. बाल विवाह रोखण्यासाठी ग्राम पातळीवरील समित्या सक्षम करण्याची गरज आहे. लग्नासाठी वयाचे दाखले या समितीकडे जमा करून त्या समितीची लेखी परवानगी घ्यावी असा नियम केला तर बाल विवाहास काही प्रमाणात आळा बसेल. बाल विवाह होऊ नये यासाठी विविध स्तरातून जनजागृती करावी. ज्याप्रमाणे अस्पृश्यता, सतीची चाल, विधवा विवाहास बंदी, केशवपन या अनिष्ट चालीचे उच्चाटन झाले त्याप्रमाणे बाल विवाहाचे देखील उच्चाटन व्हायला हवे.

# चिंताजनक विमान दुर्घटना !!

दक्षिण कोरियामध्ये जेजू एअरचे बँकॉक ते मुआन या मार्गावरचे विमान रविवारी मुआन विमानतळावर उतरताना भीषण अपघात झाला. या अपघातात विमान भस्मसात होऊन १७९ प्रवाशी दगावले. या अपघाताने संपूर्ण जगात हळहळ व्यक्त करण्यात आली. विमान अपघात घडून त्यात निष्पाप प्रवाशांचा जीव गेल्याची ही जगातील पहिलीच घटना नाही. या आधीही विमान अपघाताच्या अनेक घटना घडल्या आहेत. मागील वर्षीच म्हणजे २०२३ साली ऐन संक्रातीच्या दिवशी नेपाळमध्ये एक मोठी दुर्घटना घडली होती. नेपाळमधील प्रमुख शहरांपैकी एक असलेल्या पोखर या शहराजवळ एक प्रवाशी विमान कोसळून झालेल्या अपघातात ६० हुन अधिक प्रवाशांचा दुःखद अंत झाला होता. कोरियात झालेला विमान अपघात हा विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने झाल्याचे सांगण्यात आले आहे मात्र विमानाचा ब्लॅक बॉक्स मिळाल्यानंतरच या अपघाताचे खरे कारण समोर येईल. मागील वर्षी नेपाळमध्ये झालेला विमान अपघात हा खराब हवामानामुळे झाला होता. बहुतेक विमान अपघात हे खराब हवामानामुळेच झाल्याचे सांगण्यात येते. खरे तर उड्डाणापूर्वी प्रत्येक वैमानिकाला हवामानाचा अंदाज सांगितला जातो. या आधारावर तो आपली रणनीती ठरवतो. वातावरणाची दृष्यमानता कमी असेल तर वैमानिक उड्डाण करत नाहीत. अर्थात पर्वतीय भागात दृष्यमानता कमी असतेच.



डोंगराची कमी, जास्त उंची असल्याने आणि सतत बदलणारे हवामान, धुके यामुळे अपघात होण्याची शक्यता असते मात्र अलीकडे अद्ययावत संगणक प्रणाली असल्याने विमान किती उंचावरून जात आहे हवामानात काय बदल घडत आहे याचा अंदाज वैमानिकांना येतच असतो तरीही काही वैमानिक अतिआत्मविश्वासाने विमान उड्डाण करतात. हवामानाची पर्वा न करता स्वतःसह प्रवाशांचा जीव धोक्यात घालतात. काही वेळा पक्षाची धडक बसल्याने विमान अपघात झाल्याचे सांगण्यात येते. तांत्रिक कारण, खराब हवामान, पक्षाची धडक कारण काहीही असले तरी विमान अपघातात ज्या प्रवाशांचा यात जीव जातो तो मात्र परत येत नाही. अलीकडे विमान अपघातांचे प्रमाण खूप वाढले आहे. १९७० पासून आजवर ११ हजार १६४ विमान अपघात झाले असून त्यात ८३ हजारांहून अधिक प्रवाशी मृत्युमुखी पडले आहेत. हा आकडा चिंताजनक आहे. भारतातही अलीकडे विमानात बिघाड झाल्याच्या घटना वाढल्या आहेत. मागील वर्षी दिल्लीवरून बंगळुरुला जाणाऱ्या विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले होते. वैमानिकाने यशस्वी लँडिंग केल्याने सुदैवाने अपघात टळला होता. विमान उड्डाण करत असताना विमानातून ठिणग्या उडत असल्याचे वैमानिकाच्या लक्षात आल्याने विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले. प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्यावेळी अपघात टळला आणि शेकडो प्रवाशांचा जीव वाचला होता. त्या प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्या विमानाचा अपघात झाला नाही मात्र आपल्या देशात विमान अपघातात अनेक लोकांना जीव गमावावा लागला आहे. त्यात अनेक राजकीय आणि महनीय व्यक्तींचा समावेश आहे. संजय गांधी, माधवराव सिंधिया, जी एम सी बालयोगी हे त्यातील काही महत्वाची नावे आहेत. दोन वर्षापूर्वी भारताचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ ( सिडीएस ) जनरल बिपीन रावत यांचे एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. विमान अपघातात अशा मोठ्या व्यक्तींचे निधन होणे ही देशाची मोठी हानी आहे. केवळ मोठे सिलिब्रेटीच नव्हे तर सर्वसामान्य प्रवाशांचा जीव देखील तितकाच महत्वाचा आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीय नागरिकांसाठी तर विमान प्रवास हे स्वप्न असते आणि जर असे अपघात झाले तर त्या स्वप्नांचीच नव्हे तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचीच राखरांगोळी होते त्यामुळे असे अपघात होणार नाही याची काळजी संबंधित यंत्रणेने घ्यायला हवी.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# नववर्षानिमित्त शालेय मुलींचा बालविवाहास विरोध करण्याचा संकल्प !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, नांदेड :** देशभरात बालविवाह विरोधातील कायद्यानुसार विविध प्रकारचे प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्यानंतरही अनेक ठिकाणी बालविवाह होत असल्याचे निदर्शनास येत आहे. विशेषतः ग्रामीण भागात पालक आपल्या अल्पवयीन मुलामुलींचे विवाह करून देत असल्याचेही उघडकीस आले आहे. राज्यासह जिल्ह्यातही अल्पवयीन मुलामुलींच्या विवाहाची प्रकरणे पुढे येत आहेत. त्यात मुलींचीच संख्या जास्त असल्याने चिंतेची बाब ठरली आहे.

या पार्श्वभूमीवर शालेय वयापासूनच बालविवाहाविरोधात मत बनविणे आणि पालकांमध्ये जागृती करण्याचे उपक्रम राबविले जात आहेत. या उद्देशाने जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक गंगाधर ढवळे आणि शिक्षकांनी अनोखी शक्कल लढवित नववर्षानिमित्त शाळेत शिकणाऱ्या मुलींकडून व त्यांच्या पालकांकडून १८ वर्षे वयापर्यंत बालविवाह न करण्याचे चक्क प्रतिज्ञापत्रच भरुन घेतले आहे. नववर्षानिमित्त मुलींनी हा संकल्प केला आहे.



जिल्हा बालविवाह मुक्त करण्यासाठी जनजागृतीवर भर देण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी जिल्हा कृती दलाच्या माध्यमातून बालविवाह निर्मूलन कार्यक्रम हाती घेतला आहे. जिल्ह्यात बालविवाह होवू नये यासाठी महिला बाल विकास विभाग, युनिसेफ एसबीसीच्या वतीने विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. १८ वर्षाखालील मुला-मुलींचे लग्न लावू नयेत ते केल्यास काय शिक्षा होवू शकते, हे सर्वांना माहिती पाहिजे. यासाठी कायदयाची जनजागृती व प्रबोधन करण्यावर भर द्यावा, अशा सूचना जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिल्या आहेत. या अंतर्गत शाळेतील मुलांसाठी घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमाचा एक भाग म्हणून जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, सहशिक्षक संतोष घटकार यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय वयातच बालविवाहाविरोधी योग्य संस्कार होण्यासाठी शाळेतील मुलामुलींकडून व त्यांच्या पालकांकडून दोन टप्प्यांत बालविवाह विरोधात प्रतिज्ञापत्र लिहून घेतले आहे.

**काय लिहिले आहे प्रतिज्ञापत्रात ?**

मुलींनी लिहून दिलेल्या प्रतिज्ञापत्रात मी माझे शिक्षण पदवीपर्यंत पूर्ण करीन. कोणाच्याही सांगण्यावरून, दबावापोटी अथवा कोणत्याही आमिषाला बळी पडून माझ्या वयाची १८ वर्षे पूर्ण होण्याआधी मी माझ्या विवाहास संमती देणार नाही. कोणत्याही परिस्थितीत माझा बालविवाह होणार नाही, याची पूर्णपणे जबाबदारी घेईल असे म्हटले आहे. या मुलींच्या पालकांनीही अशाच आशयाचे प्रतिज्ञापत्र स्वाक्षरीनिशी लिहून शाळेच्या मुख्याध्यापकांकडे दिले आहे.

### उपक्रम..

नववर्षाच्यासाक्षीने
जाहीर नवे उपक्रम
जागोजाग होत राहे
संकल्पाचे रे विक्रम

अशक्यप्राय विचीत्र
ठरावकरतातचक्रम
अविचारीसंकल्पात
नसते मुळी अनुगम

साचेबद्ध ठरवलेले
सर्वत्र तेचं कार्यक्रम
काही दिस शिस्तीत
चालूठेवता दिनक्रम

संकल्प पूर्ण कराया
वेळखर्च अधिकतम
कधीकधी सहजतेने
मोडू टाके सर्वनियम

गाठण्यासाठी उद्देशा
आवश्यकअसे संयम
फारथोडे शब्दांवरती
राहतात नीत कायम

हट्टाहास संकल्पाचा
नको फुकाचा उद्यम
अर्धवट बहुतांश राहे
उपक्रम करती निर्गम

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# अनधिकृत फेरीवाल्यांवर कायमस्वरूपी कारवाई केव्हा ?

कुर्ला येथे बेस्ट बसने दिलेल्या धडकेमुळे झालेल्या जीवित आणि वित्त हानीच्या घटनेनंतर पालिका प्रशासनाला जाग आली आणि पालिकेने कुर्ला परिसरात धडक मोहीम हाती घेऊन पदपथावर बसणाऱ्या अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्यास सुरुवात केली. अनधिकृत फेरीवाल्यांनी पदपथ आणि रस्त्याच्या दुतर्फा बरीच जागा व्यापल्यामुळे वाहतुकीची कोंडी होते. फेरीवाल्यांना पदपथ व्यापल्याने नागरिकांनी चालत जायचे तरी कोठून हा प्रश्न निर्माण होतो. मुंबईतील अनेक पदपथ आज फेरीवाल्यांनी व्यापले आहेत त्यामुळे पदपथ हा प्रकार नागरिकांसाठी असतो कि फेरीवाल्यांसाठी हेही मुंबईकरांना कळेनासे झाले आहे. 'मुंबई महानगरपालिका, म्हाडा, पोलीस यांच्याकडून न्यायालयाच्या आदेशांचे पालन केले जात नाही, अनधिकृत फेरीवाल्यांचा प्रश्न गंभीर बनला आहे. पोलिसांना अनधिकृत फेरीवाल्यांना हटवता येत नसेल, तर सैन्याला बोलवायचे का ?' अशा शब्दांत मध्यंतरी मुंबई उच्च न्यायालयाने आपली उद्विग्नता नुकतीच व्यक्त केलीआहे. मुंबई आणि उपनगरे येथील अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी मुदत देऊनही न्यायालयाच्या आदेशाचे पालन न झाल्याने न्यायालयाने वरील शब्दांत पोलीस आणि मुंबई महानगरपालिकेला फटकारले होते. वाढत्या लोकसंख्येचा मुंबई शहरावर पडणारा अतिरिक्त भार, रस्ते रुंदीकरण, उड्डाणपूल, मेट्रो रेल्वेमार्ग यांसारख्या विकासकामांमुळे रस्त्यांची झालेली दुर्दशा, त्यातच शहरातील वाढत्या वाहनांमुळे ठिकठिकाणी होणारी वाहतूक कोंडी यांमुळे शहराचा श्वास कोंडतो आहे, रेल्वे स्थानक, बस स्थानक आदी गर्दीच्या ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा असणारे पदपथ अनधिकृत फेरीवाल्यांनी व्यापल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी चालायचे कोठून असा प्रश्न प्रतिदिन निर्माण होत आहे. त्यातच या फेरीवाल्यांनी सारे मार्ग दुतर्फा व्यापून टाकल्यामुळे त्यांच्या मागे असलेली अधिकृत दुकाने जी सरकारला वेळच्या वेळी कर भरतात ती झाकोळली जात आहेत. ज्याचा परिणाम या व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर होत आहे. महानगरपालिका अधिकारी आणि पोलीस यांपैकी कोणीच या अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करत नसल्याने आणि केली तरी ती केवळ नावापुरती असल्याने फेरीवाल्यांपासून सुटका करण्यासाठी सातत्याने कोणीनाकोणी न्यायालयाचे दरवाजे ठोठावत असतात.

२०१७ साली मुंबईतील एल्फिन्स्टन(आताचे प्रभादेवी) रेल्वे स्थानकाच्या पुलावर झालेल्या दुर्घटनेतून बोध घेऊन पालिका प्रशासनानेही मुंबईतील रेल्वे स्थानकापासून १५० मीटर अंतरावर पांढरे पट्टे आखून त्यांच्या आतील परिसरात फेरीवाल्यांना बसण्यास मज्जाव करणारा नियम बनवला. त्यानंतर या पट्ट्याच्या आत फेरीवाले बसणार नाहीत याची काळजीही प्रशासनाकडून काही दिवस घेण्यात आली; मात्र थोड्याच दिवसांत हा नियम बासनात बांधून रेल्वे स्थानकाजवळ पुन्हा फेरीवाले बसू लागले. रेल्वे स्थानकांजवळ रस्त्यांच्या दुतर्फा पदपथ फेरीवाल्यांनी व्यापल्यामुळे लोकांना रस्त्यावरून मार्गक्रमण करावे लागते. गर्दीच्या वेळी रस्त्यांवरील वाहतुकीच्या कोंडीमुळे त्यांतून वाट काढताना अक्षरशः नाकीनऊ येतात. फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी अधूनमधून महापालिकेची गाडी परिसरात फिरते मात्र ती येणार असल्याची बातमी फेरीवाल्यांना आधीच मिळाल्याने ते आपला माल झाकून ठेवून दूर निघून जातात. गाडी तेथून निघून गेली कि हे अनधिकृत फेरीवाले पुन्हा त्या ठिकाणी आपले बस्तान मांडतात. मुंबईतील रेल्वे स्थानकांच्या परिसरात अनधिकृतपणे बसणाऱ्या फेरीवाल्यांमध्ये बांगलादेशी तरुण मोठ्या प्रमाणात असल्याचे मध्यंतरी उघड झाले होते. या फेरीवाल्यांना बस्तान मांडण्यासाठी पदपथांवर जागा उपलब्ध करून देणे, त्या ठिकाणी विजेचे कनेक्शन उपलब्ध करून देणे, भांडवल उपलब्ध करून देणे, पोलीस आणि महापालिका यांच्या कारवाईपासून त्यांना वाचवणे यासाठी प्रत्येक रेल्वेस्थानक परिसरात म्होरके कार्यरत असून या म्होरक्यांचे महापालिका अधिकारी, स्थानिक पोलीस आणि लोकप्रतिनिधी यांच्याशी आर्थिक हितसंबंध असतात ज्यामुळे त्यांचे हे धंदे वर्षोनुवर्षे बिनदिक्कतपणे सुरु आहेत. मुंबई-ठाण्यासारख्या मराठीबहुल शहरांत बहुतांश फेरीवाले हे परप्रांतीयच आढळून येतात. हे अनधिकृत परप्रांतीय फेरीवाले त्यांच्याकडे येणाऱ्या ग्राहकांसोबत अरेरावीने वागतात, त्यांच्याकडून वस्तू खरेदी न केल्यास ग्राहकांशी विनाकारण वाद घालतात. या मुजोर फेरीवाल्यांकडून स्थानिक ग्राहकांना आणि रहिवाशांना मारहाण झाल्याच्या घटना यापूर्वी बदलापूर, ठाणे, घाटकोपर यांसारख्या ठिकाणी घडल्या आहेत. अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या महापालिका अधिकाऱ्यांवर २०० हुन अधिक बांगलादेशी घुसखोरांनी हल्ला केल्याची घटना उत्तर प्रदेशातील लक्ष्मणपूरी परिसरात नुकतीच घडली. हल्लेखोरांनी कारवाईसाठी आलेल्या अनेक अधिकाऱ्यांना मारहाण केली, गाड्यांची तोडफोड केली, महिला अधिकाऱ्यांच्या अंगावरील दागिने लुटले, पुरुष अधिकाऱ्यांचे मोबाईल्स चोरले. नागरिकांच्या सोयी सुविधांकडे दुर्लक्ष करून अनधिकृत फेरीवाल्यांची तळी भरण्यात धन्यता मानणाऱ्या महापालिका अधिकाऱ्यांच्या बाबतीत भविष्यात अशा प्रकारचे चित्र सर्वच शहरांत पाहायला मिळाल्यास आश्चर्य वाटायला नको !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## खंडाळझरी परिसरात महिलेवर केला वाघाने हल्ला



**अक्षराज : रजत डेकाटे**

**दि.०१, भिवापूर (नागपूर) :** शेतात कापूस वेचत असलेल्या महिलेवर वाघाने हल्ला केल्याची घटना भिवापूर तालुक्यातील खंडाळझरी परिसरात घडली. महिला गंभीर जखमी झाली असून तिला उमरेड येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात नंतर नागपूर येथील मेडिकल रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे. ही घटना मंगळवार, दिनांक ३१ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १२ ते १ वाजताच्या सुमारास खंडाळझरी परिसरात घडली. जखमी महिलेचे नाव इंदिराबाई तुळशीराम मसराम रा. खंडाळझरी असे आहे. प्राप्त माहितीनुसार इंदिराबाई शेतामध्ये कापूस वेचत होत्या. त्यांच्या समावेत अन्य ३ महिला व २ पुरुष सुद्धा शेतामध्ये होते. अचानक वाघाने पाठीमागून हल्ला केल्याने इंदिराबाई खाली पडल्या त्यानंतर वाघाने आपल्या जबड्यात पकडून जंगलात नेण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांच्या आरडाओरडा ऐकून शेतात असलेले अन्य दोन पुरुष त्यांच्याकडे धावले.तेव्हा वाघाने जखमी महिलेला सोडून पळ काढला. इंदिराबाईच्या डोक्याला जखम झाली असून पायाला सुद्धा जखम झाली आहे. जखमी अवस्थेत उमरेड येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेले असता त्यांना नागपूरच्या मेडिकलमध्ये हलविण्यात आले. दरम्यान उमरेडच्या वनपरिक्षेत्राधिकारी कोमल गरजे, क्षेत्र सहाय्यक सहारे, वैद्य यांनी घटनेचा पंचनामा केला असून त्वरित नुकसान भरपाई देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते चेतन पडोळे यांनी केली आहे.

## माधवराव पाटील महाविद्यालयात वाचन कौशल्य कार्यशाळा संपन्न




**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०१, पालम (परभणी) :** माधवराव पाटील महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत दि.०१ जानेवारी रोजी वाचन कौशल्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. अध्यक्षस्थानी डॉ.एच.टी.सातपुते होते. या कार्यक्रमास डॉ.ए.डी. आरसुळे व एस.जी.मठपती यांची प्रमुख उपस्थिती होती. आधुनिक युगात वाचन संस्कृती लोप पावत असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वाचन संस्कृती रुजने आवश्यक असून दर्जेदार आणि वैचारिक दिशा देणारे साहित्य विद्यार्थ्यांना उपलबध व्हावे यासाठी मार्गदर्शन करावे व उत्तम ग्रंथ उपलब्ध करून द्यावे असे प्रतिपादन एस.जी. मठपती यांनी केले. वाचनानेच माणूस समृद्ध होतो व सामाजिक वास्तवाची जाणीव होते. असे मत उपप्राचार्य डॉ.ए.डी.आरसुळे यांनी व्यक्त केले. महाविद्यालय नेहमीच अभ्यास क्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी अनेक उपक्रम राबवत असून वार्षिक विशेषांक, ग्रंथालय प्रदर्शन इत्यादींमधून वाचन संस्कृती रुजवण्यासाठी महाविद्यालय प्रयत्नशील असल्याचे डॉ.एच.टी. सातपुते सांगितले. या दरम्यान कार्यशाळेत विविध पुस्तकांचा परिचय ग्रंथापाल डॉ. जी. एन. पांचाळ यांनी करून दिला. या प्रसंगी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आजपासून भविष्य महापुराण कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.३१, पालम (परभणी) :** पालम येथील श्री संत मोतीराम महाराज नगरमध्ये श्री साईबाबा देवघर या ठिकाणी भविष्य महापुराण कथा ज्ञानयज्ञ सोहळा आज दि.०२ जाने. पासून ते दि.०९ जानेवारी पर्यंत आयोजित करण्यात आला आहे. या दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या भविष्य महापुराण कथेचे प्रवक्ते भागवताचार्य नारायण महाराज पालमकर असणार आहेत. गुरुवार, दिनांक ०९ जानेवारी २०२५ रोजी भविष्य महापुराण कथेची सांगता होईल. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. गजानन शंकरराव नारलावार व बाजीराव विठ्ठलराव चव्हाण हे कथेचे यजमान असणार आहेत. या भविष्य महापुराण कथा ज्ञान यज्ञ सोहळ्याचा लाभ शहरातील भाविक भक्तांनी घ्यावा. असे आवाहन आयोजक पदूदेवा जोशी पालमकर यांनी केली आहे.

## उद्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०१, नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत दरवर्षी शुक्रवार, दिनांक ०३ जानेवारी २०२५ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीदिन नानाविध उपक्रम राबवून उत्साहाने साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महिला व मुलांकरिता रांगोळी, मेहेंदी, निबंध, पाककला, सॅलेड सजावट, टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करणे, नृत्य व गायन स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महिला व बालकल्याण क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या सामाजिक संस्था / महिला मंडळे यांना क्रांतीज्योजी सावित्रीबाई फुले पुरस्काराने सन्मानित करण्यात येत असते.

या अनुषंगाने रांगोळी स्पर्धा, योगासने, नृत्य व गायन घेण्यात आल्या असून पाककला, सॅलेड सजावट व टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करणे या स्पर्धा दि.०३ जानेवारी २०२५ रोजी विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी या ठिकाणी घेण्यात येणार आहेत. ३ जानेवारीच्या कार्यक्रमात विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ, सावित्रीबाई फुले पुरस्कार प्रदान समारंभ तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम हे प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहेत. तरी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त महिला / महिला मंडळे / महिला बचत गट यांनी दि. ०३ जानेवारी २०२५ रोजी विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी या ठिकाणी सकाळी ९.३० वाजल्यापासून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहावे, असे जाहीर आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

# ५१ वी कुमार/कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा



**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०१, घाटकोपर (मुं.उपनगर) :** पुणे ग्रामीण, रायगड, ठाणे शहर यांनी ५१व्या कुमार/ कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत कुमार गटात उपांत्य फेरी गाठली. यजमान सांगलीला मात्र उपांत्य फेरी गाठण्यासाठी सुवर्ण चढाई पर्यंत झुंजावे लागले. सांगली विरुध्द पुणे ग्रामीण आणि ठाणे शहर विरुध्द रायगड अशा उपांत्य लढती होतील. महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने सांगली जिल्हा कबड्डी असो.ने युवक मराठा मंडळाच्या सहकार्याने राज्य संघटनेचे उपाध्यक्ष माजी आमदार दिनकर तात्या पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त या स्पर्धेचे आयोजन केले आहे.

सांगली, सांगलीवाडी येथील चिंचबाग मैदानावर सुरू असलेल्या उपांत्यपूर्व सामन्यात सांगलीने सुवर्ण चढाईच्या डावात नंदुरबारचा ३०-२९ असे चकवित उपांत्य फेरी गाठली. सुरवातीपासून अतितटीने खेळला गेलेल्या या सामन्यात पूर्वार्धात १३-१२ अशी आघाडी सांगलीकडे होती. पण नंदुरबारने पूर्ण डावात त्यांना २३-२३असे बरोबरीत रोखले. ही कोंडी सोडविण्याकरीता ५-५ चढायांचा जादा डाव खेळविण्यात आला. त्यानंतर ही २९-२९ अशा बरोबरीत हा डाव संपला. शेवटी सामन्याच्या नियमानुसार सुवर्ण चढाई देण्यात आली. त्याकरिता पुन्हा नाणेफेक करण्यात आली. नंदुरबारच्या बाजूने नाफेकीचा कौल लागला. पण नंदुरबारचा खेळाडू चढाईत गुण घेऊ न शकल्याने पंचाने त्याला बाद दिले. आणि सांगलीने एकच जल्लोष केला. आदित्य येसगुडे, व्यंकटेश वडार यांच्या झंझावाती चढाया त्यांना ओम् शिंदे, प्रतीक जाधव यांची मिळालेली पकडीची भक्कम साथ यामुळे सांगलीला हा विजय मिळविता आला. प्रणव मराठे, आलम मंसुर, पृथ्वीराज गलांडे पाटील, अतुल रोठोड यांचा खेळ नंदुरबारच्या विजया करीता थोडासा कमी पडला. पुणे ग्रामीणने ५-५ चढाईत कोल्हापूरचे आव्हान ३१-३० असे संपविले. पहिल्या डावात १३-१० अशी आघाडी घेणाऱ्या पुणे ग्रामीणला कोल्हापूरने पूर्ण डावात २५-२५ असे बरोबरीत रोखले.

या बरोबरीमुळे दोन्ही संघाना ५-५ चढाया देण्यात आल्या. त्यात एका गुणांनी पुणेकरांनी बाजी मारली. प्रणव भांगर, साहिल माने यांच्या चढाई पकडीच्या खेळाला या विजयाचे श्रेय जाते. कोल्हापूरच्या समर्थ देशमुख, शुभम रेपे यांनी शेवटच्या १० मिनिटात भन्नाट खेळ करीत. सामन्यात बरोबरी साधली. पण विजय मात्र त्यांच्या पासून दूरच राहिला. रायगडने परभणीवर ३८-३३ अशी मात केली. विश्रांतीला १९-१२ अशी आघाडी घेणाऱ्या रायगडला परभणीने नंतर कडवी लढत दिली. राज मोरे, नीरज मिसाळ यांच्या दमदार चढाया त्यांना समीर हिरवे, हर्ष सुकर यांची मिळालेली भक्कम बचावाची साथ यामुळे रायगड ने हे साध्य केले. परभणीच्या रमेश गायकवाड, बाबुराव जाधव, विजय तारे यांनी विश्रांतीनंतर आपला खेळ उंचावत कडवी लढत दिली. शेवटच्या सामन्यात ठाणे शहरने मुंबई उपनगर पश्र्चिमचा ३७-३३असा पाडाव केला. आक्रमक सुरुवात करीत ठाण्याने पहिल्या डावात २१-१२ अशी मोठी आघाडी घेतली. दुसऱ्या डावात उपनगरने आपला खेळ गतिमान करीत ही आघाडी कमी करीत आणली. पण संघाला विजयी करण्यात ते कमी पडले. आफताब मंसूरी, आदित्य पिनाने, सोहम जाधव यांच्या सर्वांगसुंदर खेळाने ठाण्याने हा विजय साकारला. उपनगरच्या ओम् कुदळे यांनी आक्रमक चढाया करीत ही आघाडी कमी केली. पण पायाला असलेल्या दुखापतीमुळे तो आपल्या संघाला पूर्ण न्याय देऊ शकला नाही. त्याला अर्शद चौधरी, अश्विन देसाई यांची मोलाची साथ लाभली. विजयापासून मात्र उपनगर दूरच राहिले.

# सखोल स्वच्छता मोहीमेद्वारे हवा गुणवत्तेत सुधारणा



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०१, नवी मुंबई :** शहरातील प्रदुषणाला आळा बसावा व हवा गुणवत्ता चांगली राहावी यादृष्टीने सखोल स्वच्छता मोहीम यांचा पंधरवडा पालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार १३ जानेवारीपर्यंत राबविण्यात येत असून ३० डिसेंबर पासून या मोहीमांना प्रभावी रितीने सुरुवात करण्यात आलेली आहे.

अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागाचे परिमंडळ १ उपआयुक्त डॉ. अजय गडदे व परिमंडळ २ उपआयुक्त संतोष वारुळे तसेच परिमंडळ १ चे उपआयुक्त सोमनाथ पोटरे व परिमंडळ २ चे उपआयुक्त डॉ कैलास गायकवाड यांच्या माध्यमातून लोकसहभागावर भर देत घेत नमुंमपा अधिकारी, कर्मचारी व स्वच्छता कर्मी यांच्या सोबतीने या सखोल स्वच्छता मोहिमा राबविण्यात येत आहेत.

यामध्ये ब्रशझाडू, फ्लीपर मशीन यांच्या सहाय्याने रस्ते, पदपथ, दुभाजक या ठिकाणी साचलेली धूळ, माती यांची सखोल सफाई करण्यात येत असून त्यानंतर फॉगर्स मशीनद्वारे मलप्रक्रिया केंद्रातून शुद्ध झालेले प्रक्रियाकृत पाणी वापरुन स्वच्छता करण्यात येत आहे. यामुळे रस्ते स्वच्छतेप्रमाणेच हवेतील धूळीचे प्रमाण कमी होऊन हवा गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा होत आहे. नागरिकांकडून या डीप क्लीनिंग मोहिमचे मोठया प्रमाणावर स्वागत करण्यात आले आहे. या अनुषंगाने ३१ डिसेंबर रोजी बेलापूर विभागात पारसिक हिल या ठिकाणी सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

बेलापूर विभागाचे सहा.आयुक्त डॉ.अमोल पालवे व स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर यांनी स्वच्छता निरीक्षक, उप स्वच्छता निरीक्षक व स्वच्छताकर्मी यांच्या सहयोगातून सखोल स्वच्छता केली. विशेष म्हणजे या मोहीमेत एसआयइएस महाविद्यालयाच्या एनएसएस विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग घेतला. नेरुळ विभाग सहा.आयुक्त जयंत जावडेकर व स्वच्छता अधिकारी अरुण पाटील यांच्या नियंत्रणाखाली प्रशांत कॉर्नर ते राजीव गांधी उड्डाणपूल ते वझीराणी स्पोर्ट्स क्लब पर्यंत रस्ते सफाई करण्यात आली.

तुर्भे विभागात सहा.आयुक्त प्रबोधन मवाडे व स्वच्छता अधिकारी जयेश पाटील यांच्या नियंत्रणाखाली कोपरी तलाव परिसरात सखोल स्वच्छता करण्यात आली. वाशी विभागात सहा.आयुक्त सागर मोरे व स्वच्छता अधिकारी जयश्री आढळ यांच्या नियंत्रणाखाली वाशीगाव आणि से.१७ परिसरात डीप क्लीनिंग मोहीम राबविण्यात आली. कोपरखैरणे विभागात सहा.आयुक्त सुनिल काठोळे व स्वच्छता अधिकारी राजूसिंग चव्हाण यांच्या नियंत्रणाखाली कोपरखैरणे रेल्वे स्टेशन परिसर सफाई करण्यात आली.

घणसोली विभागात सहा.आयुक्त संजय तायडे व स्वच्छता अधिकारी विजय पडघन यांच्या नियंत्रणाखाली घणसोली सेक्टर ३, सेंट्रल पार्क परिसरात सखोल स्वच्छता मोहीम राबविली.

ऐरोली विभागात सहा.आयुक्त डॉ. अंकुश जाधव व स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांच्या नियंत्रणाखाली टी जंक्शन ते दिवा सर्कल पर्यंत सखोल सफाई करण्यात आली. दिघा विभागात सहा.आयुक्त भरत धांडे व स्वच्छता अधिकारी प्रवीण थोरात यांच्या नियंत्रणाखाली दिघा तलाव परिसरात साफसफाई मोहीम राबविण्यात आली.

अशाप्रकारे ८ ही विभाग कार्यालय क्षेत्रात मुख्य रस्ते, त्याबाजूचे पदपथ व त्यामधील दुभाजक यांच्या कडेला जमिनीशी घट्ट झालेली माती व धूळ यांची ब्रश झाडूने स्वच्छता मित्रांनी सखोल स्वच्छता केली व त्यानंतर फॉगींग मशीनद्वारे प्रक्रियाकृत पाणी मारुन रस्ते व पदपथ स्वच्छ करण्यात आले.

उद्या ही सर्व विभागात सखोल स्वच्छता मोहीमेचे नियोजन करण्यात आले असून यामुळे वातावरणातील धूळीचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार असून या मोहीमेचे नवी मुंबईकर नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

# सिंहगड रस्त्यावर दारु सोडा, दूध प्या अभियान

## जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस् आणि सिंहगड रोड पोलीस ठाण्याचे आयोजन



**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.०१, खडकवासला (पुणे) :** अर्थ आणू जीवनाला, विसरुन जावू मद्यपानाला...मद्य करते बुद्धी भ्रष्ट, का करता जीवन नष्ट...सशक्त भारताचा एकच नारा, मद्यपानाला देऊ नका थारा...अशा घोषणा देत जनजागृतीच्या माध्यमातून सशक्त भारताकरिता दारु सोडा, दूध प्या असा संदेश देण्यात आला.

सिंहगड रस्त्यावर पोलीस अधिका-यांसह, महाविद्यालयीन विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते यांनी व्यसनाधिनतेच्या विळख्यात अडकत चालेल्या तरुणाईला निरोगी आरोग्याचा मार्ग दाखविण्याकरिता पुढाकार घेत दूध वाटप केले. सिंहगड रस्त्यावरील वडगाव पुलाखालील चौकामध्ये जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूट्स, सिंहगड रोड पोलीस स्टेशन तर्फे दारु सोडा, दूध प्या अभियान राबविण्यात आले. यावेळी सिंहगड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप दायगडे, हवेली पंचायत समिती माजी सभापती प्रभावती भूमकर, निलेश गिरमे, हरिदास चरवड, श्रीकांत सावंत, सारंग नवले, शिवा पासलकर, राणी डफळ, यशवंत मानखेडकर, एकनाथ भूमकर, सुरेश परकड, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ.सुधाकर जाधवर म्हणाले, तरुणांनी नशेच्या आहारी न जाता चांगले संकल्प करून नव्या वर्षाचे स्वागत केले पाहिजे. व्यसनांमुळे अनेक कुटुंबे उध्वस्त झाली आहेत, त्यामुळे याविरोधात जनजागृती करण्यात आली. नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी अनेक तरुण मद्यधुंद होऊन व्यसनाच्या विळख्यात अडकतात. मद्यपान करून भरधाव वेगाने गाडी चालविल्यामुळे अनेक अपघात देखील होतात. नव्या वर्षाच्या सुरूवातीला असे कोणतेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी दारू नको दूध घ्या हा उपक्रम आवश्यक आहे.ॲड.शार्दुल जाधवर म्हणाले, देशाची युवा पिढी निरोगी असेल तर देशाचा अधिक विकास होतो. आपल्या देशाला महासत्ता बनवायचे असेल तर तरुणांनी निरोगी असले पाहिजे. तरुणांनी नशेच्या आहारी न जाता चांगले संकल्प करून नव्यावर्षाचे स्वागत केले पाहिजे. नववर्षाचे स्वागत करताना चांगले विचार आणि संकल्प मनात ठेवून प्रत्येकाने व्यसनमुक्त भारताचे स्वप्न रंगवावे, याकरीता या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले, असेही त्यांनी सांगितले.

# किनवटकरांचे माजी आमदार प्रदीप नाईक यांचे निधन



**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.०१, किनवट (नांदेड) :** विधानसभेच्या किनवट मतदार संघाचे माजी आमदार प्रदीप भिमसिंग जाधव (नाईक) यांचे बुधवार, दिनांक ०१ जानेवारी २०२५ रोजी पहाटे ५ वाजता हैदराबाद स्थित त्यांच्या निवासस्थानी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. ७० वर्षाचे होते.

प्रदीप नाईक यांच्या पार्थिवावर गुरुवार, दिनांक ०२ जानेवारी २०२५ रोजी किनवट तालुक्यातील दहेली तांडा या त्यांच्या मुळ गावी शासकीय इतमाम ात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. यांच्या निधनामुळे राजकीय वर्तुळात शोककळा पसरली आहे. किनवट विधानसभा मतदारसंघाचे ते २००४ पासून सलग तिन टर्म आमदार होते. (छउझ) माजी आमदार प्रदीप नाईक यांची प्रकृती बऱ्यापैकी ठणठणीत होती.

निवडणुकीत पराभव झाल्यानंतर त्यांनी किनवट आणि माहूर तालुक्यातील सर्व कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या व कार्यकर्त्यांना निवडणुकीत झालेल्या पराभवाच्या धक्क्यातून बाहेर निघा आणि जनतेच्या कामांमध्ये हलगर्जीपणा करू नका, जिवंत राहिलो तर पुन्हा लढूत असा धीर दिला होता. शुक्रवारी ते हैदराबाद ला गेले होते. आज हैदराबाद वरून चेन्नईला ते जाणार होते. पण त्याआधीच पहाटे झोपेतच त्यांनी आखेरचा श्वास घेतला (नांदेड)या घटनेमुळे किनवट माहूर तालुक्यातील बंजारा समाजासोबतच इतर अठरा पगड जातीचे नेतृत्व म्हणून परिचित असलेल्या प्रदीप नाईक उर्फ भाया'' यांच्या निधनाने शोककळा पसरली. संयमी, शांत व्यक्तिम त्व व दूरदृष्टीचा नेता हरवल्याची भावना जनतेतून व्यक्त होत आहे.२००४ मध्ये दुसऱ्यांदा किनवट माहूर विधानसभेची निवडणूक त्यांनी लढवली यावेळी मात्र त्यांच्या गळ्यात विजयाची माळ पडली. त्यानंतर त्यांनी २००४ २०१९ सलग तीन वेळा ते विधानसभेवर निवडून गेले . म तदारसंघात रस्त्याची प्रचंड समस्या होती. मतदारसंघात आरोग्य उपकेंद्रांना इमारती नव्हत्या. किनवट तालुक्याला वळसा घालून वाहणारी पैनगंगा नदी तालुक्याला लाभली असली तरी किनवट माहूर या दोन्ही तालुक्यात उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची समस्या होती. रब्बी आणि उन्हाळी हंगामात पिके घेणे शेतकऱ्यांना कठीण झाली होते.

मतदार संघातील जवळपास ५० गावांना वळसा घालून जाणाऱ्या नदीचे पाणी अडवून मतदारसंघातील सिंचन क्षेत्र वाढवावे म्हणून प्रदीप नाईक यांनी बारा प्रकल्प हाती घेतले. त्यात पैनगंगा नदीवर चार उच्च पातळी बंधाऱ्याचा समावेश होता. त्यातील नऊ प्रकल्प पूर्ण केले. त्यामुळे किनवट माहूर तालुक्यातील अनेक गावांची पाणी पातळी वाढली आणि गावे टंचाई मुक्त झाली.

रब्बी, उन्हाळी हंगामात पीक घेणे शेतकऱ्यांना सोयीचे झाले. तसेच पंधरा ते वीस टक्के सिंचन क्षेत्रात वाढ झाली.२००८ मध्ये त्यांनी लक्कडकोट शेख फरीद वजरा येथे साठवण तलाव मंजूर करून घेतले व ते पूर्ण केले. २०१० मध्ये निराळा साठवण तलाव व मोहपूर येथील पैनगंगा नदीवर उच्च पातळी बंधारे बांधले. २०११ मध्ये सिंदगी साठवण तलाव, पैनगंगा नदीवर निगडीवल (कुत्तभार) येथे उच्च पातळी बंधारा, उणकेश्वर, मालेगाव (खा)व किनवट येथे उच्च पातळी बंधाऱ्याची मंजुरी मिळवून घेतली होती. परंतु पैनगंगा अभयारण्य क्षेत्र ही सबब पुढे करून किनवट व मालेगाव प्रकल्प थांबवण्यात आला. उनकेश्वरला सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली नाही. म्हणून हे प्रकल्प रेंगाळले होते. २०१५ मध्ये पैनगंगा नदीवर साकुर या उच्च पातळी बंधाऱ्याला मंजुरी मिळाली होती. यंदा पेंदा येथेही उच्च पातळी बंदराची मंजुरी मिळून काम झाले.

मनीरामथड हाही प्रकल्प प्रदीप नाईक यांच्या आमदारकीच्या काळात झाला. छोटे मोठे सर्वच प्रकल्प केले आणि पैनगंगा नदी बारमाही जिवंत ठेवली. निगडी उच्च पातळी बंधाऱ्यामुळे वडसा, वडसा गावातील पाणी पातळी वाढण्यास मदत झाली. उजाड रान दिसणाऱ्या दोन्ही तालुक्यात हिरवेगार रान झाले.प्रदीप नाईक यांच्या निधनामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे मराठवाड्यातील नेतृत्व हरपल्याच्या प्रतिक्रिया येत आहेत.

नाईक यांच्या निधनाची बातमी सम जताच खासदार शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष जयत पाटील, नांदेडचे खासदार अशोक चव्हाण, किनवटचे आमदार भीमराव केराम, रोहित पवार यांच्यासह दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप शिवसेना व इतर पक्षाच्या नेते व लोकप्रतिनिधी शोक व्यक्त केला आहे.

# नवीन वर्षाची सुरुवात वाचनाने

## नांदेड जिल्ह्यात वाचनसंकल्प महाराष्ट्राचा पंधरवड्यास मोठ्या उत्साहात प्रारंभ



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, नांदेड :** वाचन संकल्प म हाराष्ट्राचा वाचन पंधरवाडयानिमित्त नांदेड जिल्हयातील सार्वजनिक ग्रंथालयामध्ये १ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत ग्रंथप्रदर्शन व वाचन सामूहिक कार्यक्रम असे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या निर्दे शाप्रमाणे १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय व जिल्हयातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने आज विविध कार्यक्रमांची सुरुवात झाली त्यामध्ये ग्रंथप्रदर्शन,वाचन कौशल्य कार्यशाळा निवडलेल्या पुस्तकांचे सामुहिक वाचन लेखन व विद्यार्थी यांच्या मधील वाचन संवाद कार्यक्रम, पुस्तक परिक्षण व कथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय व राम मनोहर लोहिया सार्वजनिक वाचनालय, नांदेड वाघाळा शहर म हानगरपालिका नांदेड या अभ्यासिकेत सामुहिक वाचन करताना जिल्हा ग्रंथालय अधिकारी अ.वा.सुर्यवंशी, महापालिकेचे ग्रंथपाल श्रीनिवास इज्जपवार यांनीही विद्यार्थ्यांसोबत सामुहीक वाचन करुन वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाची सुरुवात केली.

नांदेड जिल्ह्यात आज संभाजी सार्वजनिक वाचनालय, वाढवणा, भगवान श्रीकृष्ण वाचनालय, भोकर, हु.संतराम कांगठीकर वाचनालय, अर्जापूर, सचखंड गुरुव्दारा संचलित श्री हुजूर सार्वजनिक वाचनालय, नांदेड, डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय, नगर परिषद कंधार, श्री समर्थ वाचनालय देगलूर, श्री संत नारायणगीरी महाराज सार्वजनिक वाचनालय वासरी, का.म ातोश्री सुंदराबाई सार्वजनिक वाचनालय, बिलोली यांनी या उपक्रमात प्रामुख्याने सहभाग घेतला.

# भारतरत्न : मेडलची सद्यस्थिती

भारतरत्न पुरस्काराचा निर्णय इ.स.१९५४म ध्ये तत्कालीन भारत सरकारतर्फे घेण्यात आला. दि.२ जानेवारी १९५४ रोजी भारताच्या राष्ट्रपतींनी त्यावर मान्यतेची मोहर उठवली. सन १९५५ साली कायद्यात काही बदल करून मरणोपरान्त भारतरत्न देण्याची सोय करण्यात आली. त्यानंतर १२हून अधिक जणांना मरणोपरान्त भारतरत्न दिले गेले आहे. सन २०१४मध्ये वरील क्षेत्रांबरोबरच क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्कारात स्थान देण्यात आले. सन २०१५ सालापर्यंत ४१ जणांना हा पुरस्कार लाभलेला आहे. त्यात तीन नावे परदेशी व्यक्तींची आहेत. या पुरस्काराचे वैशिष्ट्ये व तो देण्यासंबंधीचे नियम भारत सरकारच्या राजपत्रात नमूद केले आहेत. दि.२ फ ेब्रुवारी १९५४ साली पहिला पुरस्कार डॉ.राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते दिला गेला. भारतरत्न हा शब्द नावाआधी लिहिण्याचा एक किताब म्हणून वापरता येत नाही. इ.स.१९९२ साली सुभाषचंद्र बोस यांच्या नावाची भारतरत्न पुरस्कारासाठी घोषणा करण्यात आली होती. परंतु नेताजींच्या मृत्यूचा कुठलाही पुरावा उपलब्ध नसल्याने व त्यांच्या कुटुंबीयांच्या विरोधामुळे त्यांचे नाव मागे घेण्यात आले.

प्राथमिक वैशिष्ट्ये: पुरस्कार एका पदकाच्या स्वरूपाचा असेल आणि त्यास भारतरत्न संबोधले जाईल, असे ठरले. हे पदक १.३७५ इंच आकाराच्या व्यासाचे असेल आणि दोन्ही बाजूला गोल कडा असतील. पदकाच्या शीर्षपटलाच्या मध्ये उगवलेला सूर्य असून त्याची किरणे कडेपर्यंत पसरलेली असतील. सूर्यबिंबावर भारतरत्न देवनागरी लिपीत कोरलेले असेल. पदकाच्या खालील कडेवर पुष्पमाला कोरलेली असेल. पदकाच्या मागील बाजूवर मधोमध भारताचे राजचिन्ह कोरले जाईल व त्याच्या खालील बाजूच्या कडेवर सत्यमेव जयते देवनागरी लिपीमध्ये कोरले जाईल. हे पदक ०.२५ इंच रुंदीच्या पांढऱ्या रंगाच्या फितीमध्ये बांधून पुरस्कृत व्यक्तीच्या गळ्यात घातले जाईल. हे पदक राष्ट्रपतींच्या हस्तेच घातले जाईल. भारतरत्न पुरस्काराने अलंकृत व्यक्तीचे नाव भारत सरकारच्या राजपत्रात प्रकाशित केले जाईल आणि राष्ट्रपतींच्या निर्देशाधीन रजिस्टरमध्ये नोंदवले जाईल. एखाद्या व्यक्तीला दिले गेलेले पदक काढून घेणे व त्या व्यक्तीचे नाव रजिस्टरम धून कमी करणे हे अधिकार राष्ट्रपतींना असतील. तसेच एकदा काढून घेतलेले पदक पुन्हा त्या व्यक्तीला परत करणे आणि त्याच्या नावाची रजिस्टरमध्ये नोंद करण्याचा आदेश देण्याचा अधिकारही राष्ट्रपतींना राहील. जात, व्यावसायिक प्रतिष्ठा, लिंगभेद या कशाचाही परिणाम या पुरस्काराची पात्र व्यक्ती ठरविताना होणार नाही. प्रत्येक वेळेला रद्द करण्याची व पुनर्नो दणी करण्याची प्रक्रिया भारत सरकारच्या राजपत्रात प्रकाशित केली जाईल.

नवीन बदल: राष्ट्रपतींनी दि.८ जानेवारी १९५५ रोजी राजपत्रातून पदकासंबंधी काही नवीन बदल अधिसूचित केले. त्यातील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे– राष्ट्रपतींच्या हस्ते त्यांच्या मुद्रेसहित पुरस्कार प्रदान केला जाईल. हे पदक पिंपळाच्या पानाच्या आकाराचे असेल. त्याची लांबी २.३१२५ इंच, रुंदी १.८७५ इंच व जाडी ०.१२५ इंचाची राहील. हे पदक काशाचे बनवले जाईल. याच्या दर्शनी बाजूवर ०.६२५ इंच व्यासाच्या सूर्याची प्रतिकृती कोरलेली असेल. मागील बाजूवर राजचिन्ह कोरले जाईल. सूर्य व घेरा प्लॅटिनमचा असेल. अक्षरांवर चांदीचा मुलामा असेल. दि.२६ जानेवारी १९५७च्या अधिसूचनेनुसार हे पदक चमकदार काशामध्ये बदलले आहे.

मेडलची आजची स्थिती: भारतरत्न मेडल ५.८ सें.मी. लांबीचे, ४.७ सेंमी. रूंदीचे आणि ३.१ मिमी. जाडीचे पिंपळाच्या पानाच्या आकाराचे बनविलेले असते. हे कासे धातूचे बनवलेले असते. त्याच्या वरील बाजूवर १.६ सेंमी. व्यासाची सूर्याची आकृती कोरली जाते, ज्याच्या खाली देवनागरी लिपीमध्ये भारतरत्न कोरलेले असते. मेडलच्या म ागील भागावर भारताचे राष्ट्रीय चिन्ह चार सिंहांची राजमुद्रा व आदर्श घोषवाक्य कोरलेले असते. सूर्य, राजचिन्ह व कडा प्लॅटिनमच्या आणि शब्द चमकदार पितळेचे बनवले जातात. हे मेडल पांढऱ्या रंगाच्या रिबीनीमध्ये ओवले जाते. कोलकत्याला असलेल्या टांकसाळीत हे मेडल बनवले जाते. शब्द प्लॅटिनमचे आणि चमकदार पितळेचे बनवले जातात. हे मेडल पांढऱ्या रंगाच्या रिबीनीमध्ये ओवले जाते. कोलकत्याला असलेल्या टांकसाळीत हे मेडल बनवले जाते.

भारतरत्न विजेत्यांच्या सुविधा: व्हीव्हीआयपीच्या समकक्ष श्रेणी, संसदेच्या बैठका व सत्रांमध्ये सहभागी होण्याची सवलत, भारतीय प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्य दिन समारंभात सन्म ाननीय अतिथी, भारतामध्ये कुठेही जाण्यासाठी प्रथम श्रेणीचे मोफत विमान व रेल्वे प्रवास तिकिट, पंतप्रधानांच्या वेतनाएवढे किंवा त्याच्या ५० टक्के एवढे निवृत्ती वेतन, आवश्यकेनुसार झेड श्रेणीची सुविधा, माजी पंतप्रधान, केंद्र सरकारमधील कॅबिनेट स्तराचे मंत्री, लोकसभा व राज्यसभेतील प्रमुख विरोधी पक्षनेता, भारतीय योजना आयोगाचे डेप्युटी चेरमन आणि राज्यांचे मुख्यमंत्री यांच्या नंतरच्या सातव्या स्थानाच्या दर्जाचा सन्मान भारतरत्न विजेत्या व्यक्तीला दिलेला आहे. पुरस्काराचे स्वरूप: सुरुवातीला हा पुरस्कार म्हणजे ३५ मिमी. व्यासाचे एक वर्तुळाकार सुवर्णपदक असावे, अशी कल्पना होती. त्यावर एका बाजूवर मधोमध सूर्याची प्रतिमा, त्याच्या वरच्या बाजूला देवनागरी लिपीत भारतरत्न असे लिहिलेले व सूर्याच्या खालील बाजूस एक फुलांची माळ असावी, असे ठरले होते. पदकाच्या दुसऱ्या बाजूस संबंधित राज्याचे प्रतीकचिन्ह आणि त्या राज्याचे ब्रीदवाक्य असावे, अशी एक कल्पना पुढे आली होती. पण नंतर वर्षभरात त्यात बदल होत जात सन २०१५साली दिले जाणारे स्मृतिचिन्ह पक्के करण्यात आले. या भारतरत्न पुरस्काराच्या चिन्हाचे स्वरूप म्हणजे पदकावर एका सोनेरी पिंपळपानावर एका बाजूला मधोमध सूर्याची प्रतिमा व तिच्याखाली भारतरत्न असे शब्द आणि पाठीमागच्या बाजूला देशाचे राष्ट्रीय चिन्ह– चौमुखी सिंहाची प्रतिमा अशा प्रकारचे आहे. हा पुरस्कार मिळवणाऱ्यांना इतर कुठलीही विशेष पदवी किंवा मानधन वगैरे मिळत नाही. परंतु त्यांना इंडियन ऑर्डर ऑफ प्रेसिडेंसीमध्ये ७वे स्थान स्थान मिळते. हा पुरस्कार ज्या व्यक्तींना मिळाला आहे, त्यांच्या नावाआधी भारतरत्न हा शब्द उपाधीसारखा वापरायची मुभा नाही. हा पुरस्कार मिळणे खूप मानाचे समजले जाते, हे ध्यानी घ्यावे लागते.

**!! भारतरत्न पुरस्कार स्थापना दिनाच्या समस्त भारतीयांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

**– श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली.**

# थोडक्यात

## दुबई, अबुधाबीत झालेल्या जागतिक पिंच्याक सिलॅट स्पर्धेत महाराष्ट्रातील खेळाडूंची दैदीप्यमान कामगिरी



**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.०१, नवी मुंबई :** २० व्या सीनियर व ५ व्या जुनिअर वयोगटातील जागतिक पिंच्याक सिलॅट स्पर्धा नुकतीच दुबई व अबू धाबी येथे पार पडल्या या स्पर्धेसाठी ५७ देशातून ११०० खेळाडू त्यात भारतातील विविध वयोगटांमधून १२० खेळाडू सहभागी झाले होते महाराष्ट्रातील १५ खेळाडूंची निवड झालेली होती त्यांनी दैदीप्यमान कामगिरी करत ३ रजत ९ कांस्य पदके पटकावून भारताचे व महाराष्ट्राचे नाव जागतिक स्तरावर उंचावले आहे. या स्पर्धेत इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे अध्यक्ष माननीय किशोर प्रकाश येवले सर ह्यांनी ह्या २० व्या जागितक पिंच्याक सिलॅट स्पर्धेत अवघ्या १३ वर्षाच्या पदार्पणानंतर रजत पदक पटकावून इतिहास रचून सर्व खेळाडूंसमोर एक उदाहरण प्रस्थापित केले व क्रीडा क्षेत्रात खेळाडूंना नवीन मार्ग दाखवून खेळाडूंमधील उच्च दर्जाचा खेळ खेळण्यास उत्साह निर्माण केला. ह्या विक्रमी नोंदी मुळे क्रीडा क्षेत्राला एक वेगळा दृष्टिकोन मिळाला आहे. भारतासाठी पदके मिळवलेले खेळाडू : किशोर प्रकाश येवले, हर्षवर्धन अनंत भोसले, प्रथमेश दत्तू दातीर यांनी रजत पदक मिळविले. शिवतेज दिनेश पाटील, अर्णव सचिन गवई, रामचंद्र दीपक बदक, सोमनाथ सहदेव सोनवणे, कृष्णा नर्सिंग पांचाळ, पियुष अभय शुक्ला, रिया राजेश चव्हाण, प्राजक्ता प्रभाकर जाधव, भक्ती शिवाजी किल्लेदार यांनी कांस्य पदके मिळवली. वरद उमेश शेट्ये, वैभव वाल्मिक काळे, ओमकार गणेश अभंग, जयश्री कैलास शेट्ये यांनी सहभाग घेतला होता, परंतु पदक मिळवू शकले नाही. या सर्वच खेळाडूंचे इंडियन पिंच्याक सिलॅटचे अध्यक्ष किशोर प्रकाश येवले, चेअरमन मोहम्मद इक्बाल व महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट चे अध्यक्ष सुरेंद्रप्रताप सिंह खजिनदार मुकेश सोनवणे तसेच सुधीर वाडकर, सचिन शिंदे महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट चे सर्व सदस्य यांनी खेळाडूंचे प्रोत्साहन वाढवून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

## सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयात 'वाचन संकल्प' महाराष्ट्राचा सप्ताह सुरु



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०१, खंडाळा (सातारा) :** खंडाळा येथील सुशिला शंकरराव गाढवे म हाविद्यालय, वाङ्मय मंडळ, ग्रंथालय विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि एकता सार्वजनिक ग्रंथालय व वाचनालय खंडाळा यांच्या संयुक्त विद्यमाने उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या सूचनेनुसार महाविद्यालयात ०१ जानेवारी, २०२५ रोजी वाचन संकल्प महाराष्ट्राचाउपक्रम राबविण्यात आला. या समारंभासाठी राजेंद्र विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय प्राचार्य शब्बीर नालबंद यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रारंभी डॉ.प्रतिभा पाटणे यांनी उपस्थित मान्यवर एकता ग्रंथालय व सार्वजनिक वाचनालय चे अध्यक्ष जितेंद्र गाढवे,सचिव विकास गाढवे संचालक योगिता विकास गाढवे,ग्रंथपाल रेश्मा हणमंत यादव यांचे स्वागत केले.प्रास्ताविक करताना रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रदीप मेंढापुरे म्हणाले–वाचन आणि तरुणाई हे वैचारिक नातं दृढ करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्रशिक्षण विभागाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा सप्ताह उपक्रम सुरू केला आहे.यामध्ये एकता ग्रंथालय,राजेंद्र विद्यालय व वरिष्ठ महाविद्यालय यांच्या वाचक विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग आहे. यावेळी विद्यार्थी प्रतिनिधी अभिषेक शितोळे याने शाहुंच्या आठवणी पुस्तकातील संदर्भाचे, समीक्षा माने हीने सहवास वि.स. खांडेकर, इ. १० वी अ ची विद्यार्थिनी दिल्ली ऊंचा सुनती सुनती हैं या पुस्तकातील संदर्भात प्रकट वाचन केले. डॉ.पाटणे यांनी वाचन प्रेरणेसाठी ०६ जानेवारी रोजी होणाऱ्या पुस्तक परीक्षण स्पर्धेची माहिती दिली. या समारंभाचे निवेदन प्रा.अमीर इनामदार यांनी आभार ग्रंथपाल अर्चना राऊत यांनी मानले. प्रा.येवले, प्रा. ओंबळे, प्रा.पाटील, प्रा.मोरे,प्रा.चव्हाण, प्रा.मोरे,प्रा. गायकवाड प्रा.वाघापुरे आदींची उपस्थिती होती. हणमंत यादव, गेनबा चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अंजुमन हायस्कूल व ज्यु. कॉलेज महाबळेश्वरचे क्रिडा स्पर्धेत यश



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०१, महाबळेश्वर :** अंजुमन खैरुल ट्रस्ट मुंबई याच्या वतीने क्रीडास्पर्धेत चैम्पियन ट्रॉफीसाठी पात्र असलेल्या अंजुमन खैरुल इस्लाम उर्दू हायस्कूल व ज्यु. कॉलेज महाबळेश्वर मधील मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावून यश संपादन केले वाय एम ऐ .के आय इंटरस्कूल स्पोर्ट्स मुंबई आयोजित ऐ. के. आयच्या १३ शाळांनी सहभाग घेतला. त्यात सर्व संघांनी उत्तम प्रतिसाद दिला.

ऐ. के. आय व ज्यु.कॉलेज महाबळेश्वर च्या मुलींच्या संघांनी ४९ गुण मि ळवून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवून दैदिप्यमान यश मिळवले. ऐ.के.आय ट्रस्ट मान्यवरांच्या हस्ते मुलींच्या संघाला चषक देऊन मुख्याध्यापिका शबाना शेख व क्रीडाशिक्षक, सहशिक्षक तसेच पालक यांचे अभिनंदन करण्यात आले. त्याच प्रमाणे महाबळेश्वर नगरपालिकेच्या विद्यमाने आयोजीत केलेल्या माझी वसुंधरा क्रिडा मोहत्सवा मध्ये प्राथमिक व माध्यमिक शालांत गटामध्ये विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक तसेच माध्यमिक गटा मध्ये मुलांनी प्रथम क्रमांक पटकावल दैदिप्यमान असे यश प्राप्त केले. या वेळी मुख्याधिकारी योगेश पाटील, मुख्याध्यापक शबाना शेख, व शिक्षक, खेळाडू उपस्थित होते.